स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मानव्य विज्ञान शाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती
(पी.एच.डी) पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाची प्राथमिक रूपरेषा

:संशोधन अभ्यासाचा विषय:

"इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबधित घटनादुरुस्त्या
व त्यांच्या परिणामांचा अभ्यास "

संशोधक

नरवाडे साहेब तातेराव
रा.वसई ता.औंढा नागनाथ जि.हिंगोली

संशोधन मार्गदर्शक

डॉ.संजय बापुराव गायकवाड
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री योगानंद स्वामी कला महाविदयालय वसमत,
ता.वसमत जि.हिंगोली

संशोधन केंद्र

राज्यशास्त्र संशोधन केंद्र
पीपल्स कॉलेज नांदेड

डिसेंबर २०२४

“इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबधित घटनादुरुस्त्या व त्यांच्या परिणामांचा अभ्यास ”

प्रस्तावना :

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात अनेक संस्कृती ,धर्म , परंपरा एकत्र नांदताना दिसतात. असे असले तरीही भारतीय परंपरा ,जुन्या रूढी या काही समाज घटकावर प्रभाव पाडताना दिसतात. धार्मिक परंपरा ह्या जाती व्यवस्था बळकट करताना दिसतात. स्वातंत्र्यापूर्वी या जातीव्यवस्थेमुळे अनेक जाती,समुदाय भेदभावामुळे सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या पिछाडले गेल्याचे दिसतात. या सामाजिक आणि आर्थिक विषमतेला नष्ट करण्यासाठी व या समुदायांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारतीय राज्यघटनेत तरतुदी असल्याचे दिसते. या तरतुदीच्या आधारावर या पिछाडलेल्या वर्गांना विकास प्रक्रियेत अंतर्भूत करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसतात.

भारतामधील भेदभाव करणाऱ्या ,समाज व्यवस्थेने नाकारलेल्या समूहांना भारतीय राज्यघटना विकासाच्या सर्वसमावेशक संधी निर्माण करताना दिसते. भारताचा विशाल व विस्तीर्ण क्षेत्राचा विचार केला असता असे दिसते कि , प्रत्येक ठिकाणी या घटकांना तत्कालीन समाज व्यवस्थेने नाकारले व त्यांना सर्वसमावेशकपणे मुख्य प्रवाहात येऊ दिले नाही. या समुदायांमध्ये प्रामुख्याने अनुसूचित जाती,अनुसुचीत जमातीमधील समूह होते . त्याचबरोबर अजून इत्तर मागास प्रवर्गातील समूहांचा देखील यामध्ये समावेश होतो. जातीव्यवस्थेने समान संधी नाकारल्या परंतु भारतीय संविधानाने या घटकांना मुख्य प्रवाहात आणत सामजिक,आर्थिक,व राजकीय संधीची सोय केल्याचे दिसते.

प्रचंड लोकसंख्या असलेल्या भारतात इत्तर मागास प्रवर्गाची लोकसंख्या जास्त असून सुद्धा हे समुदाय जाती -जातीमध्ये विखुरल्या कारणाने मुख्य प्रवाहात समावेशन करू शकले नाहीत. परिणामी या समुदायांच्या प्रगतीमध्ये अडचणी आल्याचे दिसते. त्याच अनुषंगाने भारतीय राज्यघटनेत इत्तर मागास प्रवर्गाशी संबंधित घटनादुरुस्त्या केल्याचे आढळते.

भारतामध्ये अनेक दशकापासून सामजिक, शैक्षणिक व राजकीय दृष्ट्या मागासलेल्या प्रवर्गाला मुख्य प्रवाहत आणण्यासाठी आरक्षणाच्या माध्यमातून सोय केल्याचे दिसते. या आरक्षण संदर्भाने वेळोवेळी अद्यावत उपाययोजन केल्याच्या दिसतात. भारतीय राज्यघटनेत कलम ३४० मध्ये राष्ट्रपती मागास प्रवर्गांसाठी आयोग स्थापन करू शकतात अशी तरतूद आहे . याचाच एक भाग म्हणून पहिल्यांदा भारतीय राज्यघटनेतील तरतुदी लागू करण्यासाठी १९५३ साली काकासाहेब कालेलकर आयोग स्थापन केल्याचे दिसते. या आयोगाच्या अहवालानंतर इत्तर मागास प्रवर्ग हा मुद्दा चर्चेला आला. या आयोगाने इत्तर मागास प्रवर्गाच्या शैक्षणिक आणि सामजिक सुधारणांच्या शिफारसी केल्या ,परंतु या शिफारसी पूर्णपणे अमलात येवू शकल्या नाहीत. त्यानंतर १९८० साली बी.पी. मंडल आयोग स्थापन झाला. या आयोगाने इत्तर मागास प्रवर्गाशी संबंधित सूचना व शिफारशी केल्या. या आयोगाने इत्तर मागास प्रवर्गाना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी २७ टक्के आरक्षणाची

शिफारस केली. ज्यामुळे नौकरी व शैक्षणिक संस्थामध्ये मागासवर्ग आरक्षणाची मर्यादा ५० टक्के पर्यंत गेली. या आयोगाच्या शिफारसी लागू करण्यासाठी १९९० मध्ये व्ही.पी.सिंग सरकारने मान्यता दिल्याचे दिसते. याची परिणीती सामाजिक व राजकीय वाद निर्माण झाल्याचे पाहायला मिळते. तसेच न्यायालयीन वाद इंद्रा सहानी खटल्याने मंडल कमिशनच्या शिफारसी वैध ठरवल्या. त्याचबरोबर क्रीमिलेयर हि नवीन संकल्पना उदयास आल्याची दिसते.

१९९३ साली वैधानिक प्राधिकरण म्हणून इत्तर मागास प्रवर्गासाठी राष्टीय मागासवर्ग आयोग स्थापन करण्यात आला. त्याच धर्तीवर अनेक राज्यांत राज्य मागासवर्ग आयोग स्थापन झाल्याचे दिसते. सदरील आयोगांनी इत्तर मागास प्रवर्गाच्या समस्या,प्रश्न सोडविण्यासाठी ध्येय, धोरणे ठरविण्याचे निश्चित केल्याचे दिसते. या आयोगांनी राज्यांमध्ये असलेल्या इत्तर मागास प्रवर्गाच्या जातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसते. त्यांना आरक्षण देण्यासाठी इ.मा.प्र च्या यादीत समाविष्ट करण्यासाठी पाठपुरावा केल्याचे दिसते. परंतु अलीकडील १०२ वी घटना दुरुस्तीने राज्यांचा शैक्षणिक,सामाजिक व आर्थिक मागास घटकाना ओळखण्याचा अधिकार केंद्राकडे केंद्रित झाल्याचे दिसते. हा निकाल सर्वोच न्यायालयाने मराठा समाजाला दिलेल्या आरक्षण प्रकरणात दिल्याचे दिसते . नंतर १०५ वी घटना दुरुस्ती आणून राज्यांचा अधिकार पुन्हा संचयित करण्यात आल्याचे दिसते. आता स्वतंत्रपणे राज्य सरकारे शैक्षणिक व सामाजिक मागासांना ओळखतील असे दिसते . इत्तर मागास प्रवर्गात समाविष्ट होण्यासाठी अनेक राज्यातून सामाजिक संघटनाच्या माध्यमातून आंदोलने होताना दिसतात. या घटनादुरुस्त्यांमुळे इत्तर मागासप्रवर्गावर अनेक अंगाने सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होऊ शकतात असे दिसून येते.

भारतातील अनेक घटक राज्यात इत्तर मागास प्रवर्गाचे वेगवेगळे समुदाय असून त्यांच्या आरक्षण विषयक अनेक अडचणी व समस्या आहेत. सद्यस्थितीत बिहार ,उत्तर प्रदेश , तामिळनाडू या राज्यांनी इत्तर मागास प्रवर्गासाठी आरक्षण धोरण राबविताना समावेशक पाऊले उचलल्याचे दिसून येते. प्रत्येक राज्यांतील इत्तर मागास प्रवर्गाचे आरक्षण विषयक ध्येय, धोरणे वेगवेगळी असल्याचे दिसतात. परंतु इत्तर मागास प्रवर्ग सामाजिक शैक्षणिक ,राजकीय व आर्थिक पैलूने विकसित व्हावा अशी एकंदरीत कल्याणकारी भूमिका राज्य सरकारे व केंद्र सरकार घेत असल्याचे दिसते.

भारतातील प्रमुख समुदायापैकी इत्तर मागास प्रवर्ग हा महत्वाचा घटक आहे. जो सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला मानला जातो. यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष आणि आरक्षणाची व्यवस्था केल्याचे दिसते. हीच व्यवस्था घटनादुरुस्त्यांच्या माध्यमातून वेळोवेळी अद्ययावत झालेली आहे. या प्रवर्गाच्या विकासासाठी असलेल्या उपाय योजना प्रभावीपणे अभ्यासण्याची आवशकता वाटते .तसेच भविष्यात अनेक समुदाय आरक्षण मागणीसाठी संघर्ष करत आहेत.या संघर्षाची समाप्ती होणे आवश्यक आहे. तसेच सामाजिक सलोखा ठेवत गरजू इत्तर मागास प्रवर्गाला मुख्य

प्रवाहात आणणे महत्वाचे आहे,असे दिसते. इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबंधित घटनादुरुस्त्यांचा सूक्ष्म अभ्यास केल्यास असे दिसते कि,इत्तर मागास प्रवार्गांच्या आरक्षणाशी संबंधित घटनादुरुस्त्यांच्या संदर्भाने संशोधन कमी प्रमाणात झालेले दिसते. म्हणून "इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबधित घटनादुरुस्त्या व त्यांच्या परिणामांचा अभ्यास" हा विषय संशोधन कार्यासाठी निवडला आहे.

संशोधन समस्या (Research Problem) :

भारतीय राज्यघटनेतील भाग २० मध्ये कलम ३६८ अंतर्गत असलेल्या घटनादुरुस्तीच्या प्रक्रियेने घटनादुरुस्ती केली जाते. भारतीय राजकारणाचा इतिहास लक्षात घेता बहुमत असलेल्या सरकारांनी वेळोवेळी समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी घटना दुरुस्त्या केल्याचे दिसून येते. या घटनादुरुस्त्या संसदेत बहुमताच्या जोरावर केल्या जात असतील; तर त्यांची वैधता सर्वोच्च न्यायालय तपासते. न्यायालय व संसद यांचा संघर्ष होत असल्याचे काही निकालावरून दिसून येते. १९७३ च्या प्रसिद्ध केशवानंद भारती खटल्याने घटनेची मूलभूत चौकट बदलता येणार नाही हे स्पष्ट केले.

घटनादुरुस्त्यांचे परिणाम भारतीय राजकारणात प्रभावीपणे दिसून येतात. संशोधन समस्येचा विचार केला , तर इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबंधित घटनादुरुस्त्याचे विविध अंगाने परिणाम काय आहेत ? याचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाला काही खालील प्रश्न पडलेले आहेत. इत्तर मागासप्रवार्गाशी संबंधित घटनेतील तरतुदी ? इत्तर मागास प्रवर्गासाठी केलेले प्रयत्न ? इत्तर मागासप्रवर्गासाठी आरक्षण विषयक तरतुदी ? इत्तर मागास प्रवर्गाच्या संदर्भाने घटनादुरुस्त्या ? या घटनादुरुस्त्यासामोरील आव्हाने, घटनादुरुस्त्या अंमलबजावनीतील अडथळे ? न्यायालयांचे निकाल व त्यांचे परिणाम ? आरक्षणाच्या लाभाचे वाटप कसे ? आरक्षणाचा फायदा सर्व घटकांपर्यंत पोहचतो का ?
इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाचे सामाजिक,राजकीय व आर्थिक परिणाम ? सामजिक,आर्थिक विषमता ? इत्तर मागास वर्गाची संविदा व आकडेवारीची कमतरता ? स्थानिक स्वराज्य संस्था,नागरी शासन संस्था मधील इ.मा.प्र आरक्षण ? १०२ वी ,१०५ वी घटनादुरुस्ती का ? न्यायालयीन निर्णय ? इत्तर मागास प्रवर्गातील समुदाय व इमाप्र मध्ये समाविष्ठ करण्यासाठी इच्छुक असलेले समुदाय संघर्ष ? इत्तर मागास प्रवर्गाची क्रीमिलेयर संकल्पना ? इत्तर मागास प्रवर्गाची शैक्षणिक संस्था ,नौकरीमधील स्थिती ? जागतीकीकरण ,खाजगीकरण याचा इ.मा.प्र.वर परिणाम ? इत्तर मागास प्रवर्गातील महिलांसाठी तरतुदी ? इत्तर मागास प्रवर्गासाठी भविष्यातील नीती,धोरणे ? अशा अनेक प्रश्नांचा अभ्यास "इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबधित घटनादुरुस्त्या व त्यांच्या परिणामांचा अभ्यास " या संशोधन समस्याने केला जाणार आहे.

संशोधन विषयाचे महत्व (importance of research) :

प्रस्तुत संशोधानासाठी “इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबधित घटनादुरुस्त्या व त्यांच्या परिणामांचा अभ्यास ”हा विषय निवडला आहे. भारतीय राज्यघटना समता ,स्वातंत्र्य व न्याय या तत्वावर आधारित प्रत्येक नागरिकाला विकास प्रक्रियेत सामावून घेते .याच तत्वाने संधीची समानता देण्यासाठी भारतीय घटनेत इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबंधित तरतुदी वेळोवेळी अद्यावत झाल्याच्या दिसतात. या संबंधाने झालेल्या घटनादुरुस्त्यांचे परिणाम राजकीय,सामाजिक व आर्थिक दृष्टीकोणातून तपासणे महत्वाचे वाटते. इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबंधित जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न, पार्श्वभूमी ,घटनात्मक तरतुदी ,काकासाहेब कालेलकर आयोग, मंडल आयोग, इंद्रा सहानी खटला ,राम नंदन समिती या सर्वांचा इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबधित घटनानादुरुस्त्याशी असलेला सहसंबंध, या घटना दुरुस्त्यांचे भारतीय राजकारणात झालेले परिणाम तसेच इत्तर मागासप्रवर्ग लोकसंख्या यांचा सहसंबंध आहे . या घटकाला मुख्य प्रवाहात आणल्याशिवाय भारत विकसित होणार नाही ,असे दिसते.

त्यामुळेच या संशोधनातून इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षण आणि त्याची कार्यक्षमपणे अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी तसेच इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षण विषयक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी धोरण निर्मात्यांना उपयुक्त माहिती मिळवून देता येईल. संशोधनाच्या आधारे इत्तर मागास वर्गाच्या संदर्भाने वित्तीय , सर्वसमावेशक नवीन कल्पना सुचविता येतील.

संशोधनाची उद्दिष्टे (research objectives) :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने अध्ययनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

१) इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबंधित प्रमुख घटनादुरुस्त्या त्यांची ऐतिहसिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
२) घटनादुरुस्त्यांचा इत्तर मागास प्रवर्गाच्या सामाजिक , राजकीय , आर्थिक व शैक्षणिक स्थितीवर झालेला परिणाम अभ्यासणे .
३) आरक्षणाच्या मुद्द्याचा राजकीय दृष्टीकोनातून अभ्यास करणे.
४) आरक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी असलेल्या उपाय योजनांचा अभ्यास करणे.
५) क्रीमिलेयर संकल्पनेचा अभ्यास करणे .
६) नवीन शिफारसी व उपाय योजना सुचविणे.

संशोधनाची गृहीतके (Research Hypothesis) :
प्रस्तुत संशोधन विषयाच्या पुर्वानुमानानुसार काही गृहीतके खालील प्रमाणे आहेत.

१) इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबधित घटनादुरुस्त्यांना ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

२) घटनादुरुस्त्या इत्तर मागास प्रवार्गावर सामाजिक ,राजकीय ,आर्थिक व शैक्षणिक परिणाम करतात .

३) इ.मा.प्र. आरक्षणाचा ग्रामीण भागापेक्षा शहरी भागास अधिक फायदा झाला आहे.

४) इ.मा.प्र.च्या आरक्षणामुळे सामाजिक ,आर्थिक विषमता कमी झाली आहे .

५) स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामीण व शहरी)मध्ये आरक्षणाचा प्रभाव दिसतो .

संशोधनाची व्याप्ती (Scope of Research) :

भारतीय संविधानात घटना दुरुस्ती करण्यासाठी संसदेला विहित भाग २० मधील ३६८ कलमान्वे घटना दुरुस्ती करता येते. घटनादुरुस्तीची प्रक्रिया व आतापर्यंत झालेल्या घटनादुरुस्त्या हा संशोधन करण्यासाठी विश्लेषणात्मक विस्तृत विषय आहे. परंतु "इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबधित घटनादुरुस्त्या व त्यांच्या परिणामांचा अभ्यास "या संशोधन विषयाच्याच अनुषंगाने अभ्यास केला जाणार आहे. यामध्ये घटना अंमलबजावणी पासून ते २०२४ या कालखंडाचा समावेश असेल.यामध्ये भारतीय घटनेतील तरतुदी, पार्श्वभूमी , इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भाने घटनादुरुस्त्या त्यांचे परिणाम तपासून पाहिले जाणार आहेत.

संशोधनाची मर्यादा (limitation of research) :

संबधित संशोधन विषयाचे अंतिम उद्दिष्ट,साध्य,विषयामध्ये उपलब्ध सामग्री, वैयक्तिक वेळ आणि खर्च विचारात घेता खालील मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत.

१) सदरील संशोधन विषय हा घटनादुरुस्तींच्या संदर्भाशी निगडीत असून तो फक्त इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणासंदर्भाने झालेल्या घटनादुरुस्त्यांशी संबंधित आहे.
२) सदरील संशोधन विषय या घटनादुरुग्स्त्यांचा मराठवाडा प्रदेशातील इत्तर मागास प्रवर्गावर झालेल्या परिणामांचा अभ्यास याच्याशी संबंधित आहे .

संशोधन पद्धती (Research Method) :

"इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबधित घटनादुरुस्त्या व त्यांच्या परिणामांचा अभ्यास "
या विषयाच्या संदर्भाने विश्लेषणात्मक ,वर्णनात्मक पद्धती,संख्यात्मक व गुणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

तथ्य संकलन (Data collection) :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक व द्वितीय साधनांचा वापर केला जाणार आहे.

प्राथमिक साधने :

प्राथमिक साधनांमध्ये पारंपारिक साधनांपैकी प्रश्नावली, मुक्त प्रश्नावली, इत्तर मागास प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेणारे लाभार्थी ,लोकप्रतिनिधी ,नौकरदार वर्ग ,सामाजिक कार्यकर्ते, यांच्या मुलाखती मुलाखत अनुसूचीचा वापर करून, सर्वेक्षण, निरीक्षण करून प्रस्तुत संशोधनासाठी, त्याचबरोबर चर्चा, विचार-विनिमय करून तथ्य संकलन करण्यात येईल.

द्वितीय साधने :

द्वितीय साधनांमध्ये – संदर्भ ग्रंथ, भारतीय संविधानातील दुरुस्त्या, सरकारी संकेतस्थळे, सरकारी मासिके, अहवाल, वार्षिकी, संसदेतील कामकाजातील दस्तऐवज, भारत सरकारचे राजपत्र, राष्ट्रीय,राज्य मागासवर्ग आयोगाचे अहवाल, न्यायलयीन निकालपत्रे, इ. चा उपयोग केला जाईल. इंटरनेट, संसदेतील कामकाज या साधनांचा वापर केला जाईल.

तथ्यांचे विश्लेषण (Data Analysis) :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्यांचे संकलन केले जाईल. तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी तथ्यांचे परीक्षण करून सांखिकीय पद्धतीचा वापर , तसेच गुणात्मक विश्लेषणासाठी थीमॅटिक पद्धतीचा वापर करण्यात येईल.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने मराठवाडा प्रदेशात एकूण ८ जिल्हे व ७६ तालुके आहेत क्षेत्रफळ विस्तीर्ण असल्यामुळे संपूर्ण प्रदेशाचा अभ्यास करणे वेळेअभावी,श्रमाअभावी शक्य होणार नाही. संशोधकाचे कार्य विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी नमुना निवड पद्धतीअंतर्गत गैर संभाव्यता (non-probability) पद्धतीचा वापर करून सहेतुक किंवा उद्देश पूर्ण (purposive sampling) नमुना निवड पद्धतीने प्रत्येक तालुक्यातून उत्तरदाते निवडण्यात येणार आहेत.

मराठवाडा प्रदेशात एकूण ८ जिल्हे असून तालुक्यांची संख्या ७६ एवढी आहे. प्रत्येक तालुक्यामधून २२ उत्तरदाते निवडले जातील. ७६ तालुक्यातून मिळून एकूण नमुना १६७२ निवडला जाणार आहे. तसेच या २२ उत्तरदात्यापैकी ११ उत्तरदाते ग्रामीण भागातून, ११ उत्तरदाते शहरी भागातून निवडले जातील . त्यानुसार ग्रामीण भागातून ८३६ , शहरी भागातून ८३६ एवढे उत्तरदाते नमुना म्हणून अभ्यासासाठी निवडून संशोधन कार्य पूर्ण केले जाईल.

प्रकरणाची रूपरेषा (Chapter planning) :

प्रस्तुत संशोधनासाठी विषयाची मांडणी विषयाचा आवाका, विस्तार व संशोधनाच्या विविध पैलूंचा अभ्यास लक्षात घेता संशोधन अभ्यासाकरिता विषयाची मांडणी सहा प्रकरणात केलेली आहे.

प्रकरण पहिले – प्रस्तावना व विषय प्रवेश

पहिल्या प्रकरणामध्ये विषय प्रवेश, संशोधन समस्या, संशोधनाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, पूर्व संशोधन साहित्याचा आढावा संशोधन पद्धती, तथ्य संकलन, तथ्य विश्लेषण, अभ्यास क्षेत्र व संशोधन आराखडा, इत्यादी घटकांची चर्चा करण्यात येईल.

प्रकरण दुसरे – भारतातील इत्तर मागास प्रवर्ग आरक्षण सैद्धांतिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी

या प्रकरणामध्ये इत्तर मागास प्रवर्ग आरक्षणाची व्याख्या ,अर्थ ,उद्देश,संविधानातील आरक्षण विषयक तरतुदी, ऐतिहासिक पार्श्वभूमी, आरक्षण विषयक दृष्टीकोन , इत्तर राज्यातील इत्तर मागासवर्ग इत्यादीचा समावेश करण्यात येईल.

प्रकरण तिसरे- घटनादुरुस्त्या व इत्तर मागास प्रवर्ग आरक्षण

या प्रकरणात इत्तर मागास प्रवर्गाच्या संदर्भातील इ.स.वी. सन १९५० ते २०२४ पर्यंत झालेल्या घटनादुरुस्त्यांचा क्रमवार अभ्यास ,घटना दुरुस्तीचा उदेश,प्रक्रिया ,तेव्हाची परीस्थिति,संसदेतील घटनादुरुस्ती विधेयके इ.ची सखोल मांडणी करण्यात येईल .

प्रकरण चौथे – इत्तर मागास प्रवार्गावर आरक्षणाचा झालेला परिणाम

प्रस्तुत प्रकरणात इत्तर मागास प्रवर्गाच्या संदर्भाने झालेल्या घटनादुरुस्त्यामुळे सामाजिक , राजकीय ,आर्थिक व शैक्षणिक परिणाम , इत्तर मागास प्रवर्गात झालेले बदल मांडले जाणार आहेत. या घटनादुरुस्त्यांची न्यायालयीन स्थिती, न्यायालयाची मते,सामाजिक एकतेवर सकारात्मक व नकारात्मक परिणामाची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण पाचवे: इत्तर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाशी संबंधित आव्हाने

या प्रकरणात आरक्षण मर्यादा ,नविन समूहांची मागणी त्यांना आरक्षण देताना अडचणी,आरक्षणाची अंमलबजावणी ,जबाबदारी योग्यता ,आरक्षणाची भविष्यातील दिशा,आरक्षणाची गरज इ.उपघटकाचा समावेश करण्यात येईल.

प्रकरण - सहावे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन प्रबंधाच्या शेवटी अध्ययन विषयामधून सारांश मांडला जाणार आहे. तसेच अभ्यास विषयामधून निष्पन झालेले निष्कर्ष, गृहीतकृत्यांची पडताळणी करण्यात येईल. तसेच संशोधनांती त्यावर आधारित महत्वपूर्ण शिफारशी केल्या जाणार आहेत.

संदर्भ सूची (References) :

१) एम.लक्ष्मीकांत - इंडियन पॉलिटी,के सागर पब्लिकेशन पुणे ,महाराष्ट्र २०१७.

२) रंजन कोळंबे - भारताची राज्यघटना आणि प्रशासन भगीरथ प्रकाशन पुणे २०२१.

३) तुकाराम जाधव, महेश शिरपूरकर - भारतीय संविधान व भारतीय राजकारण खंड एक युनिक अकॅडमी पुणे २०२१.

४) सुभाष सी कश्यप - आपली संसद भारतीय संसदेची ओळख नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया २०१८

५) दुर्गादास बसू - भारतीय राज्यघटनेची ओळख लेक्सिस्नेक्सीस प्रकाशन दुसरी आवृत्ती २०१५.

६) M.V.Pylee - Constitutional amendment in India universal law of India publication Delhi 2017.

७) Dr.J .N.Pandey - Constitutional law of India central law agency Allahabad 2023.

८) Anirudha Prasad Chandra sen Pratap singh -Reservation:policy,practice and its impact on society other backword classes vol.2

९) Dr.pallavi Gupta - Backword class reservation and concept of Creamy layer .

१०) V.D.Mahajan -The constitutional History of India.

११) Pulak Chandra devanath N.B.Diwas - Other backword classes in India

१२) शासकीय अहवाल - भारताचे राजपत्र ,न्यायालयीन निकाल पत्रके ,भारतीय संविधान काका कालेलकर आयोग अहवाल, इत्तर मागास प्रवर्गासाठी धोरणे महाराष्ट्र शासनाचे कायदे.

१३) मासिके - प्रतियोगिता दर्पण,परिक्रमा,चाणक्य मंडल,दृष्टी आइएस, लोकसत्ता.

१४) वृत्तपत्रे - लोकसत्ता,सकाळ,महाराष्ट्र टाईम, द हिंदू, इंडियन एक्स्प्रेस.

१५) संकेतस्थळे - शासकीय संकेतस्थळे,शोधगंगा,संसद वेबसाईट,

१६) डिजीटल साधने - संसद टिव्ही ,सहयाद्री वाहिनी, आकाशवाणी, राजसभा टिव्ही इ.

संशोधक

नरवाडे साहेब तातेराव

संशोधन मार्गदर्शक

डॉ.संजय बापुराव गायकवाड
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री योगानंद स्वामी कला महाविदयालय वसमत,
ता.वसमत जि.हिंगोली